# प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, परभणी यांचे कार्यालय.

वाचा : १– मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे गोपनीय पत्र क. बी(जन)५६०१/५७/२०१८ /१४१२. दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८.
२– दिनांक २९–११–२०१८ रोजी शिपाई या पदाची निवड/प्रतिक्षा यादी सन–२०१८.

---

## कार्यालयीन आदेश क. ( 89 )

मा. उच्च न्यायालयाचे संदर्भीय पत्र क. १ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे जिल्हा व सत्र न्यायालय, परभणी मार्फत दिनांक २९–११–२०१८ रोजी शिपाई या पदाची निवड/प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. शिपाई पदाच्या निवड/प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांना नेमणुक देणे बाबत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, परभणी हे खालील प्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहेत.

सदरचे आदेश दिनांक ०१–०२–२०१९ पासुन अंमलात येतील.

| अ.क. | निवड/प्रतिक्षा यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | श्री. रवि कठू गायकवाड, शिपाई पदाची प्रतिक्षा/निवड यादी सन–२०१८ मधील अ.क. (३०) वरील उमेदवार | यांना शिपाई या पदावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यांत येत असुन त्यांची नेमणुक दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परभणी यांचे आस्थापनेवर सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परभणी येथे श्री. डी. एस. लोहोकरे, शिपाई यांचे ठिकाणी करण्यांत येत आहे. |

### नेमणुकीच्या अटी व शर्ती

०१) वरील उमेदवाराने कामावर रुजु झाल्यानंतर त्यानी एकनिष्ठतेची शपथ, वैदयकीय दृष्टया पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र आणि नियमानुसार आवश्यक ती कागदपत्रे त्वरीत नेमणुकीच्या ठिकाणी सादर करावीत. त्याने एक महिन्याची आगाऊ नोटीस दिल्याशिवाय राजीनामा दिला तर त्याला एक महिन्याचे वेतन सरकारजमा करावे लागेल.

०२) वरील उमेदवारास शासन निर्णय वित्त विभाग क. अंनियो–१००५/१२६/सेवा–४. दिनांक ३१–१०–२००५ आणि शासन निर्णय क. अंनियो–१००७/१८/सेवा–४. दिनांक ०७–०७–२००७ नुसार नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन लागू राहील.

०३) नवनियुक्त उमेदवारास प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्यानंतर एक महिन्याच्या आत पदस्थापनेच्या ठिकाणी रूजु व्हावे. जर विहीत मुदतीत पदस्थापनेच्या ठिकाणी रूजु झाला नाही तर त्याचे नाव प्रतिक्षा/निवड यादीतून कमी करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

०४) नवनियुक्त उमेदवार संबंधीत आस्थापनेवर रूजु झाला किंवा कसे याबाबतचा अहवाल संबंधीत कार्यालय प्रमुखांनी जिल्हा न्यायालयास सादर करावा.

जा.क.आस्था/ब–४/ 1513 /२०१९.
जिल्हा व सत्र न्यायालय, परभणी.
दिनांक : 29 / 01 / २०१९.

( उर्मिला एस. जोशी–फलके )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
परभणी.

याची एक प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषीत :

०१– दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परभणी.

०२– सहायक अधिक्षक ( रोखा व वित्त ) जिल्हा न्यायालय, परभणी.

०३– श्री. रवि कटू गायकवाड, रा. नानलपेठ नगर, बाल विद्या मंदिर प्राथमिक शाळा, परभणी.
(भ्रमणध्वनी क. ९०४९६५६७१६)
मार्फत : दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परभणी.

०४– संगणक विभाग प्रमुख, जिल्हा न्यायालय, परभणी यांना देवुन निर्देशीत करण्यात येते की, सदर कार्यालयीन आदेश जिल्हा न्यायालय, परभणीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
परभणी.